# जाहिरात

## श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

**पोष्ट – शिर्डी (४२३ १०९)**, तालुका राहाता, जिल्हा अहमदनगर

दूरध्वनी क्रमांक - (०२४२३) २५८५००

e_mail - establishment@sai.org.in / website : www.sai.org.in

## सेवानिवृत्त शासकीय अधिकारी / कर्मचारी यांची तात्पुरत्या स्वरुपात करार पध्दतीने नियुक्ती करणेबाबत

मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी या संस्थानाच्या आस्थापनेवरील विविध विभागांचा आकृतीबंध शासन निर्णय क्रमांक सासंवि-२००९/४३३/(३७/०९)/का.१६, दिनांक ०७ ऑगष्ट, २००९ अन्वये मंजूर केलेला आहे. या आकृतीबंधात विभाग व पदनिहाय २९३० स्थायी अधिक १९१८ अस्थायी (कंत्राटी) अशा एकूण ४८३८ पदांचा समावेश असून, साधारणतः विविध २९७ पदनामे समाविष्ट आहेत. सध्या विश्वस्तव्यवस्थेच्या आस्थापनेवर (१) सामान्य प्रशासन (२) लेखा (३) निवासस्थाने (४) प्रसादालय (५) आरोग्य (६) बांधकाम (७) विद्युत (८) संरक्षण (९) अग्नीशमन (१०) भूसंपादन (तांत्रिक सल्ला) (११) शैक्षणिक संकुल (१२) रुग्णालये इत्यादी विविध ४० विभाग कार्यरत असून, या विभागांमार्फत संस्थानाच्या दैनंदिन कामकाजाचे नियोजन व व्यवस्थापन करणेत येत आहे.

संस्थान प्रशासनाने मंजूर आकृतीबंधातील साधारणतः २९७ पदांचे प्रारुप सेवाप्रवेश नियम तयार केले असून, त्यास पदनिहाय अंतिम स्वरुप देणेचे काम प्रलंबित आहे. तसेच मा. शासनाने सन २००९ मध्ये मंजूर केलेल्या आकृतीबंधानंतर संस्थानाच्या आस्थापनेवर नव्याने काही अतिरिक्त / जादा विभाग निर्माण करणेत आलेले आहेत. या सर्व बाबींचा विचार करुन, संस्थानाचा सुधारीत आकृतीबंध तयार करणे, सुधारीत आकृतीबंधानुसार सेवाप्रवेश नियमांचे प्रारुप तयार करुन त्यास अंतिम स्वरुप देणे तसेच मा. शासनाने सुधारीत आकृतीबंध व सेवाप्रवेश नियमास मान्यता दिलेनंतर, बिंदू नामावली तयार करुन अद्ययावत करणे आदि अनुषंगिक आस्थापना विषयक कामकाजासाठी सेवानिवृत्त शासकीय अधिकारी / कर्मचारी यांची नामिकासूची (Panel List) / कार्यगट तयार करावयाचा आहे.

याकामी शासन / शासन अंगीकृत महामंडळे / प्राधिकरण सेवेतून निवृत्त झालेल्या वर्ग १ (वेतनश्रेणी १५६००-३९१०० + ग्रेड पे ५४०० व त्यावरील), वर्ग २ (वेतनश्रेणी ९३००-३४८०० + ग्रेड पे ४४००) व वर्ग ३ (५२००-२०२०० + ग्रेड पे २४००) मधील अधिकारी / कर्मचारी यांचेकडून सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक संकीर्ण – २७१५/ प्र. क्र. १०० / १३ , दिनांक १७ डिसेंबर, २०१६ मधील अटी-शर्तीनुसार विहित नमुन्यात अर्ज मागविणेत येत आहेत. अर्ज करतांना खालीलप्रमाणे तपशीलवार माहिती देणेत यावी.
१.अर्जदाराचे नांव / २. अर्ज केलेल्या पदाचे नांव / ३. अर्जदाराचा पत्ता / ४. भ्रमणदूरध्वनी क्रमांक / ५.ई-मेल आयडी / ६. जन्मदिनांक व वय / ७. शिक्षण / ८. सेवेचा तपशील / ९. अनुभव / १०. इतर माहिती.

तरी इच्छुक सेवानिवृत्त शासकीय अधिकारी / कर्मचारी यांनी आपले विनंती अर्ज हे **मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी** यांचे नांवाने दिनांक **०५ जुलै, २०१९** अखेर संस्थानाचे शिर्डी येथील मुख्य कार्यालयात समक्ष अथवा रजिस्टर पोष्टाव्दारे सिलबंद पाकिटात सादर करावेत.

तथापी, कुठलाही अर्ज / प्रस्ताव स्वीकारणेचा अथवा नाकारणेचा अधिकार संस्थान व्यवस्थापनाने राखून ठेवला आहे, याची कृपया नोंद घ्यावी.

संस्थानाचे सर्वसाधारण कामकाजविषयक सर्व माहिती www.sai.org.in या संस्थानाचे अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**(दी.म.मुगळीकर, भाप्रसे),**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

Printed by BoltPDF (c) NCH Software. Free for non-commercial use only.